


पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७६ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com




■ वर्ष ७६ वे/अंक २७१ वा ■ ■ अमरावती,बुधवार दिनांक २० मे २०२६ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर ३० वैशाख १९४८ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■




# विधान परिषदेच्या १७ जागांसाठी रणसंग्राम

## संख्याबळामुळे महायुतीचे पारडे जड

मुंबई दि. १९ : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १७ मतदारसंघांमधून विधान परिषदेवर निवडून द्यावयाच्या जागांची निवडणूक १८ जून रोजी पार पडणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने सोमवारी या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. या विधान परिषदेच्या निवडणुकीत महायुतीला मोठे यश मिळेल तर महाविकास आघाडीला जिंकण्यासाठी बराच संघर्ष करावा लागणार असल्याचं चित्र संख्याबळावरून दिसत आहे.



यापैकी १६ जागांसाठीची निवडणूक तर नागपूर स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी पोटनिवडणूक होणार आहे. नागपुरमध्ये भाजपचे मेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेवर निवडून गेल्याने विधान परिषदेच्या सदस्यत्वाचा राजीनामा २३ नोव्हेंबर २०२४ रोजी दिला होता. बावनकुळे यांच्या या जागेचा कार्यकाळ १ जानेवारी २०२८ पर्यंत आहे. त्यामुळे बावनकुळेंच्या जागेवर निवडणून येणाऱ्या आमदाराला दीड वर्षासाठीच आमदारकी मिळणार आहे. अन्य १६ जणांना ६ वर्षाचा कार्यकाळ मिळेल. अलीकडच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत महायुतीला मोठे यश मिळाल्याने या निवडणुकीत महायुतीचेच वर्चस्व दिसून येईल.

या निवडणुकीसाठीचे मतदार हे महापालिकांचे सर्व नगरसेवक, नगरपालिका, नगरपंचायतींचे अध्यक्ष आणि नगरसेवक, जिल्हा परिषदांचे सदस्य, सर्व स्वीकृत सदस्य, कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सदस्य असतात.

१) पुणे २) अहिल्यानगर *(पान २ वर)*

# सरकारचा शेतकरी कर्जमाफीचा निर्णय लांबणीवर पडणार

## विधानपरिषद निवडणुकीच्या आचारसंहितेचा अडसर?

मुंबई दि. १९ : महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीवेळी सत्तेत येण्यासाठी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. कर्जमाफीचा निर्णय आता आणखी काही दिवस लांबवणीवर पडण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जून महिन्यापर्यंत कर्जमाफी होईल, असे आश्वासन दिले होते. मात्र, कर्जमाफीच्या या निर्णयाला विधानपरिषद निवडणुकीच्या आचारसंहितेचा ब्रेक लागला आहे. विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता सोमवारपासून लागू होणार आहे. ही निवडणूक बिनविरोध न झाल्यास २५ जूनपर्यंत आचारसंहिता राहणार आहे. ३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफी करण्याचे सरकारचे आश्वासन होते. सहकार मंत्रालयाने तसा प्रस्तावही तयार केला होता. मात्र, आता विधानपरिषद निवडणुकीमुळे हा निर्णय लांबवणीवर पडणार, असे दिसत आहे. यामुळे बळीराजाला कर्जमाफीसाठी आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे.

विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यास शेतकरी कर्जमाफीच्या अंमलबजावणीत अडचणीची शक्यता वर्तविली जात आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीत महापालिकांचे सर्व नगरसेवक, नगरपालिका, नगरपंचायतींचे अध्यक्ष आणि नगरसेवक, जिल्हा परिषदेचे सदस्य, सर्व स्विकृत सदस्य आणि कॅन्टोन्मेंट बोर्डाचे सदस्य असतात. सर्वसामान्य मतदार नसल्याने सरकारकडून कर्जमाफीचा निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी सूत्रांची माहिती आहे

मात्र, सर्वसामान्यपणे असे मोठे निर्णय घेण्याचे टाळले जाते, असं तज्ज्ञांचे म्हणणे आहे. अशात, राज्य सरकारकडून शेतकरी कर्जमाफीसंदर्भात काय प्रक्रिया पुढे केली जाते आहे *(पान २ वर)*

# पेट्रोल-डिझेलच्या किंमती पुन्हा वाढल्या

नवी दिल्ली दि. १९ : पंतप्रधान नरेंद्र मोदी तमाम देशवासियांना आगामी काळात इंधनाचा वापर जपून करण्याचे कळकळीचे आवाहन केल्यानंतर अनेकांना भविष्यातील आर्थिक अरिष्टाची चाहूल लागली होती. ही भीती आता खरी ठरताना दिसत असून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात दुसऱ्यांदा वाढ करण्यात आली आहे. यापूर्वी १५ मे रोजी पेट्रोलच्या दरात ३ रुपये आणि डिझेलच्या दरात ३.११ रुपयांची घसघशीत वाढ करण्यात आली होती. त्याला चार दिवस उलटत नाही तोच आता पेट्रोल आणि डिझेलच्या दरात दुसऱ्यांदा वाढ झाली आहे. देशातील प्रत्येक शहरात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वेगवेगळी वाढ झाली आहे. त्यानुसार दिल्लीत पेट्रोलच्या दरात ८७ पैसे आणि डिझेलच्या *(उर्वरित पान २ वर)*

## विदर्भात उन्हाचा रुद्रावतार

नागपूर दि. १९ : विदर्भात उन्हाचा चटका प्रचंड वाढला असून उष्णतेची लाट आणखी तीव्र झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून कमाल तापमानात सातत्याने वाढ होत असून, विदर्भातील तीन जिल्ह्यांनी तापमानाची सर्वोच्च पातळी ओलांडली आहे. काल (१८ मे) वर्धा येथे सर्वाधिक ४६.५ अंश सेल्सिअस इतक्या उच्चांकी तापमानाची नोंद झाली. या वाढत्या उष्णतेमुळे नागपूर प्रादेशिक हवामान केंद्राने अकोला, अमरावती, यवतमाळ आणि *(उर्वरित पान २ वर)*

## शिवराज मोटेगावकरच्या मोबाईलमध्येच मिळाला नीट पेपरफुटीचा सर्वात मोठा पुरावा

मुंबई दि. १९ : वैद्यकीय, अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेश पूर्व परीक्षांसह इतर परीक्षांची शिकवणी घेणाऱ्या आरसीसी क्लासेच संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर याला थेट नीट पेपरफुटीप्रकरणातच अटक झाली आहे. शिवराज मोटेगावकरचा नीट पेपर फुटी रॅकेटमध्ये सहभाग असल्याचा सीबीआयचा आरोप आहे. त्याबद्दल काही पुरावेही सीबीआयला मिळाल्याचे सूत्रांनी सांगितले.



शिवराज मोटेगावकरने त्याच्या साथीदारांच्या मदतीने नीट प्रश्नपत्रिका परीक्षा होण्यापूर्वीच मिळवल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. सीबीआयने केलेल्या आतापर्यंतच्या तपासातून अशी माहिती समोर आली आहे की, शिवराज मोटेगावकर याचे एनटीए अर्थात नीट परीक्षा घेणाऱ्या राष्ट्रीय संस्थेतील प्राध्यापकांशी संबंध आहेत. पी.व्ही. कुलकर्णी याच्याशी मोटेगावकरचे खूप जवळचे संबंध आहेत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मोटेगावकरच्या *(पान २ वर)*

# देशात आर्थिक संकटाचे वादळ येणार, सर्वसामान्य भरडले जाणार; पेट्रोल-डिझेल दरवाढीनंतर राहुल गांधींचा इशारा



नवी दिल्ली दि. १९ : पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्यांच्या खिशावर ताण वाढत असताना लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. देश लवकरच मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करणार असून त्याचा सर्वाधिक फटका युवक, शेतकरी, कामगार आणि लघुउद्योजकांना बसेल, असा इशारा त्यांनी दिला.

**मोठं आर्थिक वादळ येणार**

रायबरेली दौऱ्यावर बोलताना राहुल गांधी म्हणाले की, देशातील सध्याची आर्थिक व्यवस्था काही मोजक्या उद्योगपतींच्या फायद्यासाठी तयार करण्यात आली आहे. ही व्यवस्था जास्त काळ टिकणार नाही आणि लवकरच देशाला मोठा आर्थिक धक्का बसू शकतो. जो आर्थिक झटका बसणार आहे त्याचा परिणाम उद्योगपतींवर होणार नाही, तर सामान्य नागरिकांवर होणार आहे.


राहुल गांधी यांनी उद्योगपती गौतम अदानी आणि मुकेश अंबानी यांचा उल्लेख करत केंद्र सरकारची आर्थिक धोरणे काही निवडक उद्योगसमूहांना लाभदायक असल्याचा आरोप केला. या धोरणांचा सर्वाधिक फटका उत्तर प्रदेशातील युवक, शेतकरी, मजूर आणि छोट्या व्यावसायिकांना बसणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्यांवरून टोला**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नॉर्वे दौऱ्याचा उल्लेख करत राहुल गांधी यांनी सरकारवर टीका केली. सरकार लोकांना परदेश प्रवास कमी करण्याचा सल्ला देत आहे, मात्र पंतप्रधान स्वतः *(पान २ वर)*

## शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली नीट पुनर्परीक्षेच्या तयारीसंदर्भात उच्चस्तरीय आढावा बैठक संपन्न

नवी दिल्ली दि. १९ : नीट पेपरफुटीच्या प्रकरणानंतर ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता पुन्हा नव्याने ही परीक्षा होणार आहे. आज याबाबत शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली झालेली उच्चस्तरीय बैठक पार पडली. मागील परीक्षेदरम्यान पेपर लीक, सुरक्षेतील त्रुटी आणि परीक्षा केंद्रांवरील गैरव्यवस्थापनाचे आरोप समोर आल्यानंतर केंद्र सरकार आणि शिक्षण मंत्रालयावर मोठा दबाव निर्माण झाला होता. मात्र आता आगामी परीक्षेत कोणतीही चूक होऊ नये, यासाठी परीक्षेची संपूर्ण प्रक्रिया अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि त्रुटीरहित करण्यावर या बैठकीत भर देण्यात आला.



बैठकीदरम्यान प्रश्नपत्रिकांची सुरक्षित वाहतूक आणि साठवण, परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही आणि डिजिटल मॉनिटरिंग, उमेदवारांची कडक ओळख पडताळणी तसेच सोशल मीडियावर अफवा आणि चुकीची माहिती रोखण्यासाठी उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. सर्व राज्यांतील जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांसोबत समन्वय बैठका घेऊन परीक्षा व्यवस्थेवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

प्रत्येक परीक्षा केंद्रावर कडक पोलीस बंदोबस्त, सीलबंद प्रश्नपत्रिकांची देखरेख आणि संशयास्पद हालचालींवर तात्काळ कारवाई करण्यावर भर दिला जाणार आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी परीक्षा केंद्रांवरील सतर्कता आणि सुरक्षा कोणत्याही परिस्थितीत कमी होता कामा नये, असे स्पष्ट केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या सुविधांकडेही विशेष लक्ष देण्याचे आदेश *(उर्वरित पान २ वर)*


## नीट पाठोपाठ एमएच - सीईटी परीक्षेतही गैरप्रकार?

मुंबई दि. १९ : देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणानंतर आता महाराष्ट्रातील एमएच-सीईटी प्रवेश परीक्षेतही मोठा गैरप्रकार झाल्याचा संशय काँग्रेसने व्यक्त केला. इयत्ता १२ वीच्या परीक्षेत अवघे ३७ टक्के मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला सीईटी परीक्षेत थेट ९९ पर्सेन्टाईल गुण कसे काय मिळू शकतात? असा सवाल काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी उपस्थित केला. मुंबईत आयोजित एका पत्रकार परिषदेत त्यांनी याचे काही धक्कादायक पुरावे सादर केले.

पत्रकारांशी बोलताना सचिन सावंत यांनी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या कारभारावर गंभीर बोट ठेवले. ते म्हणाले की, इयत्ता १० वी आणि १२ वीच्या परीक्षेत अवघे ४० किंवा ४५ टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना एमएच-सीईटी परीक्षेत १०० टक्के गुण मिळाले *(उर्वरित पान २ वर)*

### माहोल....

पेट्रोल महाग झाले तसेच पेट्रोलची कमतरता




पेट्रोल महाग झाले म्हणून सायकल काढली खरी पण आता वाटते आहे की गाडीच काढायला पाहिजे होती....

## महाराष्ट्र सरकार अणू ऊर्जा निर्मिती करणार, ६,५०,००० कोटींचा करार



मुंबई, दि. १९: प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवून देशात शून्य कार्बन उत्सर्जन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्ट पूर्तीसाठी महाराष्ट्र पुरेपूर प्रयत्न करीत आहे. स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यात येणारी गुंतवणूक ही देशाला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवण्यासाठी निश्चितच बळ देणारी ठरणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. राज्यात अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या कंपन्यांना शासनाच्यावतीने संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीही यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली.

मंत्रालयात आयोजित बैठकीत अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये राज्य शासनासोबत *(उर्वरित पान २ वर)*

### तापमान

| | | |
|---|---|---|
| अमरावती | – | ४६.८ |
| अकोला | – | ४६.० |
| बुलढाणा | – | ४१.६ |
| ब्रह्मपुरी | – | ४३.८ |
| चंद्रपूर | – | ४५.२ |
| गडचिरोली | – | ४४.० |
| गोंदिया | – | ४३.८ |
| नागपूर | – | ४५.५ |
| वर्धा | – | ४६.५ |
| वाशिम | – | ४३.५ |
| यवतमाळ | – | ४५.४ |
| भंडारा | – | ४३.० |

## विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका बिनविरोध व्हाव्यात: बावनकुळे

नागपूर दि. १९ : महायुतीकडे ७५ टक्के मतदान असल्याचा दावा करत सध्या देशासमोरील सध्याचे संकट लक्षात घेता नागपूर विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी सर्व पक्षांच्या नेत्यांशी चर्चा करण्यात येणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. राज्यातील ज्या निवडणुका बिनविरोध होऊ शकतात, त्यासाठीही पुढाकार घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते.



महायुतीच्या पारड्यात ७५ टक्के मतदान असल्याचा दावा करत सध्या देशासमोरील सध्याचे संकट लक्षात घेता ही निवडणूक बिनविरोध व्हावी, असा आमचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील ज्या निवडणुका बिनविरोध होऊ शकतात, त्यासाठीही पुढाकार घेतला जाणार आहे. *(उर्वरित पान २ वर)*

